**रे.दि.अपील क्र.१६५/२०१९**
CNR - MHST01-002112-2019

**निशाणी क्र.२५ खालील आदेश**

(रामचंद्र खाशाबा भोईटे मयत वारस विरुध्द नामदेव खाशाबा भोईटे मयत वारस)

रिस्पॉन्डंट क्र.५ मयत झाल्याने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी हा अर्ज सादर केला आहे.

२) निशाणी क्र.२५ वरील अर्ज व त्यापुष्टयर्थ सादर केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. रिस्पॉन्डंटतर्फे अर्जावर दिलेले म्हणणे वाचले.

३) अपेलंटतर्फे कथन की, रिस्पॉन्डंट क्र.५ सुनंदा विलास निकम या दिनांक ०८/०८/२०२२ रोजी मयत झाल्या असुन त्यांना अर्जात नमुद केलेप्रमाणे वारस आहेत. तरी प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली वारस सामिल करणेबाबतची मागणी मुदतीत असलेने अर्ज मंजूर करणेची विनंती केली. रिस्पॉडंटतर्फे योग्य आदेश पारित करणेची विनंती केली.

४) अपेलंटच्या कथनाप्रमाणे रिस्पॉन्डंट क्र.५ या मयत झाल्याने त्यांचे अर्जात नमुद केलेले वारस रेकॉर्डवर घेणेची विनंती केली आहे. रिस्पॉन्डंटतर्फे योग्य आदेश पारित करण्याची मागणी केली. रिस्पॉन्डंट क्र.५ दिनांक ०८/०८/२०२२ रोजी मयत झाल्या असुन प्रस्तुतचा वारस सामिल करणेबाबतचा अर्ज दिनांक १८/१०/२०२२ रोजी दाखल करण्यात आला. निशाणी क्र.२९ वरील मृत्यू प्रमाणपत्रावरुन रिस्पॉन्डंट क्र.५ सुनंदा बाबुराव निकम या दिनांक ०८/०८/२०२२ रोजी पिंपोडे बु., तालुका कोरेगांव, जिल्हा सातारा येथे मयत झाल्याचे दिसुन येते. प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली वारस सामिल करणेबाबतची मागणी मुदतीत असल्याने मयत रिस्पॉन्डंट क्र.५ यांचे अर्जात नमुद केलेप्रमाणे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी देणे योग्य होईल. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

(१) अर्ज (निशाणी क्र.२५) मंजुर करणेत येतो.

(२) मयत रिस्पॉन्डंट क्र.५ सुनंदा विलास उर्फ बाबुराव निकम यांचे अर्जात नमुद केलेप्रमाणे वारस सामिल करण्यास परवानगी देणेत येते.

(३) सदरची दुरुस्ती मुदतीत करावी.

NITIN HANMANTRAO JADHAV
Digitally signed by NITIN HANMANTRAO JADHAV
Date: 2024.04.05 13:37:41 +0530

सातारा. (नि.ह. जाधव)
दिनांक – ०५/०४/२०२४. जिल्हा न्यायाधीश–३, सातारा